


# महागिरी

## एक हत्तीची गोष्ट

सांगत आहेत : हेमलता

रेखांकन : पुलक बिस्वास

भाषांतर : वेद क्वोळे

लहान मुलांसाठीचे भारतातील एक उत्कृष्ट पुस्तक



महागिरी नावाचा एक मोठ्ठा हत्ती होता.

त्याचा आकार इतका प्रचंड होता की लहान मुले त्याच्या जवळ जायलासुद्धा घाबरायची.



महागिरीचा मालक एक व्यापारी होता.

तो महागिरीला कामाला लावून खूप पैसे कमवायचा.



बऱ्याचदा तो महागिरीला जंगलात ओंडके वाहून न्यायला पाठवायचा.



लग्नात नवरदेवाला मिरवत नवरीमुलीच्या घरापाशी न्यायला पाठवायचा.



देवळात उत्सव असला की महागिरीला मिरवणुकीचे नेतृत्व करायला पाठवायचा.



एकदा गावातल्या लोकांनी देवळात एक उत्सव साजरा करायचा ठरविले.
पण देवळाचा झेंडा उभारल्याशिवाय उत्सव सुरू होऊ शकत नव्हता.
प्रश्न असा होता की देवळात झेंडा तर होता पण तो उभा करायला खांबच नव्हता.



म्हणून गांवकरी एका जंगलात
गेले आणि त्यांनी एक उंच
सागवानाचं झाड तोडले



आणि त्यापासून एक सुंदर खांब बनविला.



पण तो खांब इतका लांब आणि जड होता की सगळ्यांना मिळून सुद्धा तो उचलता येइना!

म्हणून त्यांनी महागिरीला बोलविले.

महागिरीने त्याच्या सोंडेत पकडून तो खांब मंदिरापर्यंत आणला.



गांवकऱ्यांनी मंदिरापाशी एक खड्डा खणला आणि महागिरीला खांब त्या खड्डयात उभा करायला सांगितले.



महागिरीने खांब खड्डयापर्यंत आणला मात्र,
अचानक तो थांबला आणि मागे वळला.



माहूताने महागिरीला खांब खड्डयात उभा करायची आज्ञा दिली.

तरीही महागिरी जागचा हलला नाही.

माहूताने पुन्हा पुन्हा सांगूनही महागिरीने त्याची आज्ञा पाळली नाही.



माहूताने त्याच्या जाड काठीने
महागिरीला खूप बडवलं.

मारून मारून त्याची काठी तुटून गेली,
पण महागिरी शांत उभा राहिला.



लोक आता रागावले.

ते माहूतावर ओरडायला लागले की तो एक वाईट माहूत आहे.



मग माहूत पण चिडला. त्याने त्याचा धारदार खंजिर काढला आणि "आता तू माझी आज्ञा मोडणार नाहीस!" अस म्हणत तो खंजिर अनेक वेळा महागिरीच्या मानेत खुपसला.

महागिरीला आता वेदना सहन होइना. रागावून त्याने तो खांब भिरकावून दिला.



तो मोठ्यांदा ओरडला आणि त्याने माहूताला खाली फेकून दिले.

लोक घाबरले.

त्यांना वाटलं की हत्ती वेडा झाला. सगळे लोक पळून गेले.



महागिरी एकटाच तिथे उरला.

तो खड्ड्यापाशी गेला अन खाली बसला.

त्याची सोंड त्याने त्या खड्ड्यात टाकली.



सोंडेत काहीतरी उचलून त्याने
ते अलगद जमिनीवर ठेवलं.

अरे! एक छोटसं मांजर!!

ते मांजर त्या खड्ड्यात लपून
बसलं होतं.



लोक थोडया अंतरावरून हा सगळा प्रकार पहात होते.
आता त्यांना कळलं की महागिरीने माहूताची आज्ञा का पाळली नाही.
त्या एवढया महाकाय हत्तीला त्या छोटयाश्या मांजराला इजा पोहोचवायची नव्हती.
ते मोठ्या आनंदाने महागिरीपाशी धावत गेले.



मग महागिरीने तो खांब उचलून खड्डयात उभा केला,
आणि लोकांनी माती टाकून खड्डया बुजवेपर्यंत सोंडेत उभा धरून ठेवला.



लोकांनी महागिरीला प्रेमाने थोपटलं.त्याला मिठाई आणि फळं खायला दिली.

महागिरी जखमी झाल्याचं त्यांना खूप वाईट वाटलं.



त्या दिवसापासून महागिरी सर्वांचा लाडका बनला.मुलांना तर तो फारच आवडायचा.

आणि जेव्हा कधी व्यापारी त्यांना महागिरीवर बसून फुकट चक्कर मारून आणायचा तेव्हा त्यांना खूप आनंद व्हायचा.



शेवट